




# आपला महाराष्ट्र

मूल्य २.००

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने

WWW.APLAMAHARASHTRA.IN

संयुक्त वर्ष ६८ ■ अंक क्र.१५२ ■ मंगळवार ११ मार्च २०२५ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ४

POST REGD.No./DHL/53/24-26



उत्कृष्ट क्वालिटी
साबुदाणा ५५ रु.किलो
शेंगदाणे १०० रु.किलो
सेंद्रिय गुळ ५० रु.किलो
सागर ड्रायफ्रुट
पत्ता : व्ही.के.चौधरी मार्केट, हॉटेल शेरे पंजाब समोर, पाचकंदिल, धुळे (मो.९३७११९२०००)


# अजित पवारांकडून महाबजेट सादर; घोषणांचा पाऊस

## पंतप्रधानांच्या विकसित राष्ट्र संकल्पनेला पाठबळ दिल्याचा दावा; विरोधकांकडून मात्र सडकून टीका

**मुंबई, दि.१०- राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी आज विधानसभेत आपला अकरावा अर्थसंकल्प सादर केला. यावेळी त्यांनी अनेक महत्त्वाच्या घोषणा केल्या. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी २०४७ पर्यंत भारताला विकसित राष्ट्र बनवण्याचा संकल्प केला आहे. त्यांच्या संकल्पपूर्तीला बळ देणारा वर्ष २०२५-२६ चा अर्थसंकल्प असल्याचे अजित पवार यांनी सांगितले. दरम्यान, या अर्थसंकल्पावर मात्र विरोधी पक्षांनी सडकून टीका केली असून लाडक्या बहिणींपासून युवकांपर्यंत साऱ्यांची घोर निराशा करणारा अर्थसंकल्प असल्याच्या प्रतिक्रिया विरोधी सदस्यांनी दिल्या आहेत.**



महाराष्ट्र आता थांबणार नाही.., विकास आता लांबणार नाही... असे सांगत शेती, शेती पुरक क्षेत्रं, उद्योग, व्यापार, शिक्षण, आरोग्य, पर्यटन, पायाभूत सुविधा, सामाजिक विकास अशा अनेक क्षेत्रांसाठी भरीव तरतूद असलेला, विकसित भारत-विकसित महाराष्ट्राचे स्वप्न प्रत्यक्षात आणणारा हा अर्थसंकल्प आहे. यातून देशांतर्गत, विदेशी गुंतवणूक, रोजगार, स्वयंरोजगाराच्या संधी वाढतील. विधानसभा निवडणुकीत राज्यातील मतदारांनी व्यक्त केलेला विश्वास सार्थ ठरवण्यात अर्थसंकल्प यशस्वी होईल, असा विश्वास उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केला. अजित पवार यांनी वर्ष २०२५-२६ चा अर्थसंकल्प आज विधानसभेत सादर केला. अर्थसंकल्पीय भाषणाच्या सुरुवातीलाच त्यांनी महाराष्ट्राचे आराध्य दैवत युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराज, स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज, स्वराज्यजननी जिजाऊ माँसाहेब, छत्रपती राजर्षि शाहू महाराज, क्रांतीसूर्य महात्मा ज्योतीराव फुले, महामानव भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर, राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे या महामानवांचे स्मरण केले. शिखांचे नववे गुरु, श्री गुरु तेगबहादूर यांच्या हौतात्म्याचे हे ३५० वे वर्ष आहे. स्वराज्य सौदामिनी महाराणी ताराबाई यांचे हे त्रिशतकोत्तर सुवर्ण महोत्सवी जयंतीवर्ष आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे त्रिशताब्दी जन्मवर्ष आहे. देशातील लोकशाहीचा आधारस्तंभ असलेल्या आपल्या संविधानाला ७५ वर्षे पूर्ण झाली आहेत. याचाही कृतज्ञतापूर्वक उल्लेख त्यांनी केला. राज्यात गुंतवणुकीला (पान ४ वर)

## भारतीय संघाच्या अभिनंदनाचा प्रस्ताव अन् राजकीय टोलेबाजी!

**मुंबई, दि.१० (किशोर आपटे)- भारतीय क्रिकेट संघाने आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ जिंकल्याने सोमवारी विधान परिषदेत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी संघाच्या अभिनंदनाचा प्रस्ताव मांडला असता भारतीय संघाच्या विजयाचा उत्सव साजरा करतानाच सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये जोरदार राजकीय टोलेबाजी, चिमटे काढण्यात आल्याने संपूर्ण सभागृह हास्यकल्लोळात बुडाले. कारण तब्बल बारा वर्षांनी दुबईमध्ये झालेल्या अंतिम सामन्यात भारतीय संघाने न्यूझीलंडवर चार विकेट्सनी विजय मिळवत चॅम्पियन्स ट्रॉफीवर आपले नाव कोरले.**

यावेळी बोलताना उपमुख्यमंत्री शिंदे यांनीही, हा प्रत्येक भारतीयासाठी आनंदाचा सोनेरी क्षण असल्याचे सांगितले. तब्बल १२ वर्षांच्या प्रतीक्षेनंतर भारताला हे यश मिळाले. संघ म्हणून एकत्र येऊन काम केले, तर दैदीप्यमान यश मिळते. कारण आम्हीही नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत असेच संघ म्हणून काम केले आणि निर्णायक विजय मिळवला, असे म्हणत विरोधकांना डिवचले. त्यावर विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनीही मग आपसुकच महायुती सरकारला मार्मिक शब्दात बोलत चिमटे काढत प्रत्युत्तरही दिले. भारतीय संघाने ज्या पद्धतीने खेळ केला, तो अभिमानास्पद आहे. मात्र हे करताना त्यांनी कोणतेही फेरफार, पैसे वाटप किंवा ईव्हीएम मॅनेज न करता सर्व सामने जिंकले! असे सांगताच मोठा हशा पिकला. तसेच, संघातील सर्व खेळाडूंना विधानभवनात बोलावून त्यांचा सत्कार करा (पान ४ वर)

## लाडक्या बहिणींनो एकविसशे रुपये विसरा!



**मुंबई, दि.१०- अर्थमंत्री अजित पवारांनी आज सादर केलेल्या अर्थसंकल्पात लाडक्या बहिणींसाठी अपेक्षित असलेली वाढीव तरतूद केलेली नाही. त्यामुळे बहिणींना एकविसशे रुपये विसरावे लागणार आहेत. पंधराशे रुपयांवरच समाधान मानावे लागेल.**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेंतर्गत सुमारे २ कोटी ५३ लाख लाभार्थी महिलांना जुलै, २०२४ पासून आर्थिक लाभ देण्यात येत आहे. त्यासाठी ३३ हजार २३२ कोटी रुपये खर्च झाला आहे. सन २०२५-२६ मध्ये या योजनेकरीता एकूण ३६ हजार कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे. या योजनेतून मिळणा-या अनुदानाचा उपयोग काही महिला गटांनी आर्थिक उपक्रमासाठी बीज भांडवल म्हणून केला असून अशा गटांना आणखी प्रोत्साहन देण्यासाठी विशेष योजना हाती घेण्याचे विचाराधीन असल्याचे अजित पवारांनी सांगितले. लाडकी बहीण योजनेतून आतापर्यंत २३ हजार २३२ कोटी खर्च झाला असून २ कोटी ५३ लाख महिलांना लाभ मिळाला. तर २०२५-२६ मध्ये ३६ हजार कोटींची तरतूद करण्यात आली आहे. मुख्यमंत्र्यांनी (पान ४ वर)

## अर्थसंकल्पात अजित पवारांनी केल्या बारा मोठ्या घोषणा

**मुंबई, दि.१०- उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित पवार यांनी महायुती सरकारचा २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी मोठ्या घोषणा केल्या आहेत. वीजबिलपासून लाडक्या बहिणीपर्यंत मोठ्या घोषणा केल्या आहेत. अर्थसंकल्पातील प्रमुख मुद्द्यावर एक नजर टाकूयात.**

* मुंबई, पुणे, नागपूर या महानगरातील प्रवाशांना वातानुकुलित प्रवासाची सुविधा देण्यासाठी मुंबई-पुण्यात ६४ किमीचे मेट्रो मार्ग सुरु होणार आहेत. ठाणे मेट्रो, पुणे मेट्रोच्या विस्तारीकरणाला मंजुरी देण्यात आली आहे.

* राज्यातील औद्योगिक वीज दर कमी होणार असल्याचे म्हटले आहे. महावितरण कंपनीने येत्या ५ वर्षांसाठी वीजेचे दर निश्चित करण्याचा प्रस्ताव महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडे सादर केला आहे. या काळात ऊर्जा क्षेत्रातील नियोजन व कमी दराच्या हरित ऊर्जेच्या खरेदीमुळे वीज खरेदी खर्चामध्ये १ लाख १३ हजार कोटी रुपयांची बचत होणार आहे त्यामुळे औद्योगिक वीज दरात कपात होणार आहे.

* राज्यातील युवकांना रोजगार देण्यासाठी अर्थसंकल्पात महत्वाची तरतूद करण्यात आलेली आहे. रोजगार वाढवण्यासाठी नवी मुंबई येथे २५० एकर क्षेत्रावर नाविन्यता नगर, इनोव्हेशन सिटी उभारली जाणार आहे. तसेच रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाकडून मायक्रोसॉफ्ट कंपनीमार्फत १० हजार महिलांना कौशल्य व कृत्रिम बुध्दिमत्ता या विषयाचे प्रशिक्षण देण्यात येत आहे

* मुंबईच्या विकासासाठी अर्थसंल्पात महत्वाची तरतूद करण्यात आलेली आहे. मुंबई महानगर प्रदेश भागाला आंतरराष्ट्रीय दर्जाचे आर्थिक विकास केंद्र, म्हणजेच 'ग्रोथ हब' बनवले जाणार आहे. याअंतर्गत वांद्रे-कुर्ला संकुल, कुर्ला-वरळी, वडाळा, गोरेगाव, नवी मुंबई, खारघर व विरार-बोईसर या सात ठिकाणी आंतरराष्ट्रीय दर्जाची व्यापार केंद्रे तयार केली जाणार आहेत.

* वाढवण बंदराजवळ मुंबईसाठी तिसरे विमानतळ, वाढवण बंदराजवळ मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेनचे स्थानक, हे बंदर समृध्दी महामार्गालाही जोडणार आहे.

* महायुतीने सरकार आल्यास लाडक्या बहिणींना दरमहा २१०० रुपये देण्याची घोषणा केलेली आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेंतर्गत सुमारे २ कोटी ५३ लाख लाभार्थी महिलांना जुलै, २०२४ पासून आर्थिक लाभ देण्यात येत आहे. त्यासाठी ३३ हजार २३२ कोटी रुपये खर्च झाला आहे. सन २०२५-२६ मध्ये या योजनेकरीता एकूण ३६ (पान ४ वर)




## प्रशिक्षणार्थींना कायम सवेत घ्या अन्यथा रास्ता रोको करणार : देवरे

**धुळे, दि.१०- मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण अंतर्गत प्रशिक्षणार्थिंना ६+५=११ महिना शासनाने वाढवून दिलेली आहे त्याबद्दल आभार. विविध विभागांत प्रशिक्षण पुर्ण केल्यानंतर आस्थापनांवर काम करणाऱ्या प्रशिक्षणार्थींना तत्कालिन मुख्यमंत्री ना.एकनाथ शिंदेंनी जाहीर केल्यानुसार कायम सेवेची संधी द्यावी. अन्यथा राज्यभर रास्ता रोको आंदोलन करू. असा इशारा आदर्श मल्हार बहुजन सेना ऑल इंडियाचे अभिलाल देवरे यांनी पत्रकार परिषदेत दिला.**

पत्रकार परिषदप्रसंगी अभिलाल देवरे समवेत सारीका मोरे, प्रदिप अहिरे, शाहिना मनीयार, नईम मनीयार उपस्थित होते. महाराष्ट्रात एकुण एक लाख तेवीस हजार प्रशिक्षणार्थी आहेत त्यापैकी साडेतीन हजार धुळे जिल्ह्यात विविध आस्थापनांवर कार्यरत आहेत. युवा कार्य प्रशिक्षण योजनेतील शासकीय कार्यालयात अठ्ठ्याहत्तर हजार चारशे बत्तीस तर खाजगी कार्यालयांमध्ये चाळीस हजार दोनशे पंचवीस प्रशिक्षणार्थींचा समावेश आहे. प्रशिक्षणार्थींच्या विविध मागण्यांमध्ये वेतनात वाढ करणे, शासकीय निम शासकीय कर्मचाऱ्यांसाठीच्या सर्व सवलती द्याव्या, प्रशिक्षणार्थींसाठी दहा टक्के जागा राखीव ठेवाव्या यांसारख्या अनेक मागण्याचा समावेश आहे. तत्कालिन मुख्यमंत्री (पान ४ वर)

## कुत्रा आडवा आल्याने अपघात; दुचाकीस्वार ठार

धुळे, दि.१०- धुळे तालुक्यातील अंबोडे ते नवलनगर रस्त्यावरून जाणाऱ्या दुचाकीस्वारा समोर कुत्रा आडवा आल्याने दुचाकी घसरून अपघात झाला. या अपघातात दुचाकीस्वार गंभीर जखमी होवून त्याचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. योगेश संजय नरोटे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, अंबोडे गावातील रहिवासी दिलीप अशोक नरोटे (वय ४०) हे दुचाकी क्र. एमएच १८/सीएफ-१६६२ घेवून आंबोडे ते नवलनगर रस्त्याने जात असतांना आंबोडे गावाजवळ कुत्रा आडवा आल्याने दिलीप नरोटे यांनी ब्रेक दाबल्याने दुचाकी घसरून रस्त्यावरील बैलगाडीवर जाऊन आदळली. दिलीप नरोटे यांना गंभीर दुखापत होवून त्यांचा मृत्यू झाला.

## लाचखोर महसूल सहाय्यकाला धुळे एसीबीने रंगेहाथ पकडले



**धुळे, दि.१०- गौण खनिजासह जप्त केलेल्या ट्रॅक्टरवरील दंडाची रक्कम कमी लावण्यासाठी तेरा हजारांची लाच घेणारे महसुल सहाय्यक दिनेश सुर्यभान वाघ (वय ३९) रा.१९, बिजली नगर, नकाणे रोड, देवपूर धुळे यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने रंगेहात पकडले आहे.**

साक्री तालुक्यातील कोकले गावातून वाळुची वाहतुक करणारे ट्रॅक्टर महसुल विभागाच्या भरारी पथकाने दि.५ मार्च २०२५ रोजी जप्त करून साक्री तहसिलकार्यालयाच्या आवारात लावण्यात आले होते. वाळु वाहतुक प्रकरणी दंडात्मक कारवाई करण्यात आली. उपाविभागीय कार्यालयातून दंडाची रक्कम कमी करण्यासाठी महसुल सहाय्यक दिनेश वाघ यांनी पंधरा हजारांची लाच तक्रारदाराकडे मागितली. याप्रकरणी तक्रारदाराने लाचलुचपात (पान ४ वर)

## मांडळ गावातून दागिने लांबविले

धुळे, दि.१०- शिरपूर तालुक्यातील मांडळ गावातील घराच्या दरवाजाचे कुलुप तोडून अज्ञात चोरट्यांनी घरात प्रवेश केला. घरातील सोने-चांदीचे दागिन्यांसह एकोणऐंशी हजार सहाशे त्र्याहत्तर रूपये किंमतीचा मुद्देमाल चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे.नरेंद्र निकम यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, मांडळ कृष्णा व्हिला प्लॉट नं.१७ ब येथे दि.५ मार्च रोजी रात्रीच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी घराचे कुलुप तोडून प्रवेश केला. घरातील एकोणऐंशी हजार सहाशे त्र्याहत्तर रूपये किंमतीचा मुद्देमाल चोरून नेला. याप्रकरणी शिरपुर शहर पोलीस स्टेशनला अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




## शासनाने देयके रोखल्याने ठेकेदारांचा आत्महत्येच्या इशाऱ्यासह मोठा मोर्चा

**धुळे, दि.१०- ठेकेदारांनी विकास कामे स्वखर्चाने कर्ज काढून पुर्ण केलेली आहेत. धुळे जिल्ह्यातील ठेकेदारांचे साडे सहाशे कोटी रूपयांची बिले शासनाकडून मिळत असल्याने ठेकेदारांच्या आर्थिक अडचणी वाढल्या आहेत. थकलेली देयके तातडीने अदा करण्यात यावी अन्यथा कर्जामुळे वैतागलेले ठेकेदार शेतकऱ्यांसारखेच आत्महत्या करतील असा इशारा देत धुळे जिल्हा कॉन्ट्रॅक्टर असोसिएशनने भव्य मोर्चा काढून जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले.**

ठेकेदारांनी बँकेमधुन कर्ज काढून तसेच कामासाठी लागणारे साहित्य व्यापाऱ्यांकडून उधारीने घेतले आहे. मार्च ऐंडींग मुळे बँकांकडूनही पैशांचा तगदा लावला जातो आहे. काही ठेकेदारांना मालमत्ता जप्तीच्या नोटीस आल्या आहेत. दि.१४ जानेवारी २०२५ रोजी संघटनेच्यावतीने (पान ४ वर)



## जयचंद ॲग्रोने लाखोंचा भुखंड हडपला : माजी आ.गोटेंचा आरोप

**धुळे, दि.१०- मृत महिलेच्या जागेवर दुसरीच महिला उभी करुन जयचंद ॲग्रो इंडियाने दहा एकर जमिन हडपल्याचा आरोप शिवसेनेचे नेते तथा माजी आमदार अनिल गोटे यांनी केला आहे.**

पत्रकार परिषदेत माजी आ.गोटे म्हणाले की, इंदुबाई निंबा पाटील यांचे दि.१४/०८/१९९३ रोजी सावळदे ता.धुळे येथे निधन झाले. तर त्यांचे पती निंबा दामु पाटील यांचे ५ मार्च २००० रोजी निधन झाले. या मृत कुटूंबाच्या नावावर निमगुळ ता.शिंदखेडा गावच्या शिवारात वारसा हक्काची १० एकर १९ गुंठे एव्हढी बागायती शेत जमिन होती. जयचंद ॲग्रो कंपनीचे तत्कालीन संचालक गुलाबसिंग चौधरी यांनी कंपनीच्यावतीने दि.९ एप्रिल २००८ रोजी शिंदखेडा येथील सबरस्टिर कार्यालयात या जमिनीचे बोगस खरेदीखत नोंदविले. सदर खरेदी खतावर दर्शविण्यात आलेल्या महिलेचे १९९३ मध्ये निधन झालेले असताना मृत्यूच्या तब्बल पंधरा वर्षांनी तिच्या नावाचे बागायती क्षेत्र कसे काय खरेदी केले गेले. यासंदर्भात मयताच्या जवळच्या नातेवाईकांनी दोंडाईचा पोलिसात फसवणुकीची तक्रार नोंदविली. परंतु ही तक्रार शिंदखेडा पोलिस स्टेशनला दाखल करा असे दोंडाईचा पोलिसांनी सांगितले. २ एप्रिल २०१२ (पान ४ वर)

## ईदनिमित्त कामगारांचे वेतन, बोनस वेळेत अदा करा

धुळे, दि.१०- धुळे शहर व तालुक्यातील सर्व पॉवरलूम, सायजिंग, गाठप्रेस व इतर आस्थापना मालकांनी कामगारांना विहित वेळेत हक्क वेतन व बोनस वाटप करण्यात यावे. असे आवाहन सरकारी कामागार अधिकारी मधुरा सुर्यवंशी यांनी प्रसिध्दी पत्रकान्वये केले आहे. रमजान ईदनिमित्त दरवर्षी कामगारांना हक्क रजा व बोनस रमजान ईदच्या ८ ते १० दिवस अगोदर वाटप करण्यात येते. चालू वर्षाची ईद काही दिवसांवर असून सर्व मालकांनी कामगारांना हक्क रजेचे वेतन व बोनस प्रदान अधिनियम, १९६५ मधील तरतुदींनुसार किमान ८.३३ टक्के ते कमाल २० (पान ४ वर)

## सातपुडा पर्वतरांगेत होलिकोत्सव सुरु भोंगऱ्या बाजारात ग्राहकांची गर्दी

**नंदुरबार, दि.१० (प्रतिनिधी) - सातपुडा पर्वतरांगेत होलीकोत्सवाला सुरुवात झाली आहे. या होलीकोत्सवानिमित्त भरणाऱ्या भोंगऱ्या बाजाराला विशेष महत्व असते. या भोंगऱ्या बाजारातून विविध साहित्यांची खरेदी विक्री होवून उलाढाल होत असते. दहा मार्च रोजी धडगाव येथे भोंगऱ्या बाजाराला प्रारंभ झाला.**

आदिवासी कला, संस्कृतिचे दर्शन घडण्यासाठी लागणारे विविध साहित्य या भोंगऱ्या बाजारात मोठ्या प्रमाणावर खरेदी विक्री असून होलिकोत्सवासाठी विविध वस्तुंची खरेदी करण्यासाठी दुर्गम व अतीदुर्गम भागातील आदिवासी बांधव शहरातील बाजारपेठेत हजेरी लावत असून विविध साहित्याच्या खरेदी विक्रीमुळे दोन दिवसात उलाढाल वाढली आहे. आज सोमवारी येथे भोंगाऱ्या बाजार भरला. होलिकोत्सयासाठी परंपरेप्रमाणे विविध वेशभूषा करण्यात येतात. यासाठी लागणारे घुंगरु, शोभेचे साहित्य, रंगीबेरंगी कागद, कपडे यांची खरेदी करण्यासाठी आदिवासी युवक आणि ज्येष्ठ गेल्या दोन दिवसांपासून धडगांवच्या बाजारात भेट देत आहेत.पितळी घुंगरु, ढोलवर (पान ४ वर)

## बजेटमध्ये लालपरीची झोळी रिकामीच

मुंबई, दि.१०- महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ आर्थिक संकटात आहे. एकीकडे गुजरात, उत्तर प्रदेश आणि कर्नाटकाने त्यांच्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेसाठी अत्याधुनिक बस स्थानके आणि गाड्यांची तजवीज करीत असताना महाराष्ट्राच्या अर्थसंकल्पात एसटी महामंडळ आणि कर्मचा-यांची देणी चुकती करण्यासाठी (पान २ वर)

## धुळ्यात पीजी फाउंडेशनच्या वतीने रंगणार रंगीबेरंगी होळीचा सोहळा

**धुळे, दि.१०- रंगांची मुक्त उधळण करीत विचारांची देवाणघेवाण करणारा तसेच एकमेकांमधील स्नेह वाढविणारा होळीचा सण धुळे शहरात मोठ्या उत्साहात दरवर्षी साजरा करण्यात येत असतो. यंदाही होळीच्या निमित्ताने सर्वपक्षीय तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत पीजी फाउंडेशनच्या माध्यमातून ॲड.पंकज गोरे यांच्या वतीने येत्या बुधवारी रंगीबेरंगी होळीचे आयोजन करण्यात आले आहे. भगवा चौक येथे सायंकाळी पाच वाजता होणाऱ्या या होळीच्या कार्यक्रमाला विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत.**

धुळे शहर आणि होळीचा सण हे समीकरण गेल्या अनेक वर्षांपासून राज्यात प्रसिद्ध आहे. धुलीवंदनाचा सण धुळे शहरात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येत असतो. विविध ठिकाणी मोठ्या उत्साहात होळीचे आयोजन करण्यात येत असते, रंगांची मुक्त उधळण करायला लावणारा तसेच एकमेकांमधील विचारांची देवाण-घेवाण करायला लावणारा तसेच एकमेकांमधील वैचारिक मतभेद बाजूला करून सगळ्यांना एकत्र आणणारा हा होळीचा सण अनोख्या पद्धतीने साजरा व्हावा तसेच यातून सामाजिक राजकीय शैक्षणिक सांस्कृतिक अशा विविध क्षेत्रातील स्नेह अधिक वृद्धिंगत व्हावा या उद्देशाने गेल्या अनेक वर्षांपासून पीजी फाउंडेशनच्या वतीने ॲड.पंकज गोरे यांच्या माध्यमातून रंगीबेरंगी होळीचे आयोजन करण्यात येत असते.

या रंगीबेरंगी होळीच्या उत्साहात सर्व पक्षीय पदाधिकारी, पोलिस, डॉक्टर, वकील, पत्रकार, प्राचार्य, व्यापारी व सामाजिक क्षेत्रात काम करणारे सर्व मान्यवर सहभागी होत असतात. बदलत्या काळात सर्वच क्षेत्रातील आव्हाने आणि वाढती स्पर्धा लक्षात घेता विविध क्षेत्रात काम करणाऱ्या अनेकांचे अनेक रंग दररोज पाहायला मिळत असतात. मानवी स्वभावाचे विविध रंग हे आपल्या कार्याच्या ठिकाणी देखील उमटत असतात. या रंगांची देखील वेगळ्या पद्धतीने ओळख व्हावी तसेच त्यातून वैचारिक देवाण-घेवाण होण्यासह वाढत जाणारा स्नेह हा अधिक आनंददायक होत असतो. तसेच संपूर्ण वर्षभर विविध क्षेत्रात काम करणारी मान्यवर मंडळी या सणाच्या निमित्ताने एकत्र येत असतात. या उद्देशाने ॲड.गोरे यांच्या वतीने भगवा चौक येथे सर्वपक्षीय तसेच राजकीय सामाजिक शैक्षणिक सांस्कृतिक पत्रकारिता आणि प्रशासन या क्षेत्रातील मान्यवरांना एकत्र आणून या होळी सणाचे आयोजन करण्यात येत असते. सालाबादाप्रमाणे यंदाही येत्या १२

| १० रोजा ११ | |
| --- | --- |
| ११ मार्च २४ | १२ मार्च २४ |
| इफ्तार | सहेरी |
| ६.४१ | ५.२३ |


दिपक ज्वेलर्स
सोने- 22 K -79,200 रु.+3% GST
सोने- 24 K -86,500 रु.+3% GST
चांदी- 01,0100 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३





पान १ वरुन

## पवारांकडून महाबजेट सादर

पोषक वातावरण असल्याचे सांगत उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, औद्योगिक विकासात राज्य सदैव अग्रेसर असून थेट विदेशी गुंतवणूकीच्या बाबतीतही देशात अव्वल आहे. जानेवारी, २०२५ मध्ये दावोस येथे झालेल्या जागतिक आर्थिक परिषदेमध्ये राज्य शासनाव्दारे एकूण ६३ कंपन्यांसोबत सामंजस्य करार करण्यात आले. त्याव्दारे येत्या काळात १५ लाख ७२ हजार ६५४ कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे. त्यातून सुमारे १६ लाख रोजगार निर्मिती होईल, असा अंदाज आहे. वस्तू व सेवा कर कायदा लागू होण्यापूर्वी राज्यकर विभागातर्फे राबविण्यात आलेल्या विविध कायद्यांनुसार सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांकडे असलेली थकबाकीची तडजोड करण्याबाबतची अभय योजना उपमुख्यमंत्र्यांनी अर्थसंकल्पात जाहीर केली. सदर अभय योजनेचे नाव महाराष्ट्र कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क (सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्यानी प्रदेय असलेल्या) यांच्या थकबाकीची तडजोड करण्याबाबत अधिनियम, २०२५ असे असून या अभय योजनेचा कालावधी प्रस्तावित कायदा लागू झाल्याच्या दिनांकापासून दिनांक ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत असेल, असे त्यांनी स्पष्ट केले.

## भारतीय संघाच्या अभिनंदनाच्या प्रस्ताव

आणि जर राज्याची आर्थिक स्थिती चांगली असेल, तर त्यांना प्रत्येकी १ कोटी बक्षीसही जाहीर करा, अशी मागणीही त्यांनी केली. मग सभागृहातले खेळते वातावरण पाहता काँग्रेसचे आमदार भाई जगताप यांनीही या चर्चेत उडी घेतली आणि भारतीय संघाचा कर्णधार रोहित शर्मा याने प्रत्येक सामन्यात नाणेफेक हरली तरीही संघाने विजय मिळवला, हे लक्षात घेत नाणेफेक हरली म्हणून त्यांनी हिंमत सोडली नाही, असा मार्मिक शब्दात महायुतीला चिमटा काढला.

यावर प्रत्युत्तर देताना सत्ताधाऱ्यांनीही मग लागलीच नाणेफेकीवर प्रश्न विचारण्यापेक्षा चांगला खेळ करण्यावर भर दिला. त्यांच्याकडून खूप काही शिकण्यासारखे आहे, असा प्रतिटोला लगावला. यावेळी भारतीय संघाच्या विजयाचे कौतुक करताना दोन्ही बाजूने जोरदार राजकीय आरोप-प्रत्यारोपांचे फटाके उडाले. तर सत्ताधारी आणि विरोधकांमधील ही शाब्दिक चकमक सभागृहात चांगलीच रंगतदार झाली आणि उपस्थित सदस्यांसाठी एक करमणुकीचा क्षणही ठरला. मात्र त्याचवेळी सभागृहात भारतीय संघाच्या सत्कारासाठी विशेष कार्यक्रम घ्यावा, त्यांना रोख बक्षीस द्यावे, अशी मागणी विरोधकांनी केली. मात्र यावर आता सरकार कोणता निर्णय घेते, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

## एकविसशे रुपये विसरा!

अर्थसंकल्पाच्या वेळी २१०० रुपये देऊ असे म्हटले होते. तुम्ही जे २१०० मान्य केलेत ते येणा-या अर्थसंकल्पातून देणार का असा सवाल उपस्थित करण्यात येत होता. मात्र लाडकी बहीण योजनेसाठी गेल्यावर्षी जी तरतूद करण्यात आली, तेवढ्याच रकमेची तरतूद २०२५-२६ वर्षासाठी करण्यात आली आहे. त्यामुळे लाडक्या बहीणींना २१०० रुपये मिळणार नाही, हे स्पष्ट झाले आहे.

## पवारांनी केल्या १२ मोठ्या घोषणा

हजार कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

* एकेकाळी नक्षलग्रस्त म्हणून ओळखला जाणारा गडचिरोली जिल्हा आता स्टील हब म्हणून उदयास येत आहे. दावोस येथे झालेल्या जागतिक आर्थिक परिषदेमध्ये गडचिरोली जिल्ह्याकरिता २१ हजार ८३० कोटी रुपयांच्या गुंतवणूकीचे सामंजस्य करार करण्यात आले. त्यातून ७ हजार ५०० रोजगार निर्मिती होणे अपेक्षित आहे.

* कायदेशीर खटले जलदगतीने निकाली काढण्यासाठी राज्यातील नवीन १८ न्यायालय उभारण्यात येणार तसंच पायाभूत सुविधांचे बळकटीकरण करण्यात येणार आहे.

* सर्वांसाठी घरे हे उद्दीष्ट येत्या ५ वर्षात साध्य करण्यासाठी राज्याचे नवीन गृहनिर्माण धोरण लवकरच जाहीर करण्यात येणार आहे. ग्रामीण घरकुलांसाठी १५ हजार कोटी तर शहरी आवास योजनांसाठी ८ हजार १०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

* महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या ६ हजार डिझेल बसचे रुपांतर सीएनजी आणि एलएनजी बसमध्ये करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

## प्रशिक्षणार्थींना कायम सवेत घ्या

ना.एकनाथ शिंदेंनी प्रशिक्षणार्थी सेवेत सामावून घेण्याचे आश्वासन दिले होते. त्यानुसार शासनाने प्रशिक्षणार्थींना कायम सेवेची संधी दयावी. अशी मागणी करण्यात आली. अन्यथा रास्ता रोको आंदोलन करू तरी देखील शासनाने दुर्लक्ष केल्यास आमरण उपोषण धुळे तालुक्यातील आनंदखेडा, सुट्रेपाटा येथे आमरण उपोषण करण्याचा इशाराही देवरेंनी यावेळी दिला.

## जयचंद अ‍ॅग्रोने लाखोंचा भुखंड हडपला

रोजी तक्रार दिली. परंतु गुन्हा दाखल केला गेला नाही. त्यामुळे न्यायालयाच्या आदेशाने गुन्हा दाखल झाला. गुन्हा दाखल होवून १४ वर्ष उलटले तरी देखील तपास सुरुच आहे. ही जमिन जयचंद अ‍ॅग्रोने हडपल्याचा आरोप माजी आ.गोटेंनी पत्रकार परिषदेत केला.

## सातपुडा पर्वतरांगेत होलिकोत्सव सुरु

चढवण्यात येणारे चामडे, विविध प्रकारचे सजावटीचे साहित्य, लायटींग यांची खरेदी करण्यासाठी येत आहे. यातून उलाढाल होत असते. वार्षिक उत्सवात सहभागी होण्यासाठी युवकांच्या तयारीलाही वेग आला आहे. धडगांवसोबत मोलगी येथील बाजारपेठेत गर्दी होत असल्याचे दिसून आले आहे. एकीकडे भोंगऱ्या बाजाराची तयारी सुरु गेल्या महिनाभरापासून सुरू असलेल्या ढोल तयार करण्याची कामेही अंतिम टप्प्यात आहेत.

## ईदनिमित्त कामगारांचे वेतन, बोनस वेळेत अदा करा

टक्के प्रमाणे बोनस तात्काळ वाटप करावे. जेणेकरुन कामगारांना ईद साजरी करता येईल. तसेच वेतना संदर्भात कामागारांची काही तक्रार असल्यास त्यांनी आस्थापनेचे नाव, मालकाचे नाव, संपूर्ण पत्ता व मोबाईल नंबरसह सरकारी कामगार अधिकारी यांचे कार्यालय, धुळे येथे तक्रार करावी. असेही सरकारी कामगार अधिकारी मधुरा सूर्यवंशी यांनी शासकीय पत्रकान्वये कळविले आहे.

## आत्महत्येच्या इशाऱ्यासह मोठा मोर्चा

निवेदन देण्यात आल्यानंतरही शासनाने त्यावर अद्याप कोणतीही उपाय योजना केलेली नाही. त्यामुळे फेब्रुवारी २०२५ पासुन कामे बंद करण्यात आली तरी देखील शासनाने कोणतेही पाऊ न उचलल्याने मोर्चा काढण्यात आला. ठेकेदारांच्या मोर्चात धुळे जिल्हा कॉन्ट्रॅक्टर असोसिएशनचे सचिव प्रकाश जानकीराम पांडव, अध्यक्ष संदीप महाले, कार्याध्यक्ष दिपक भामरे, उपाध्यक्ष तुषार रंधे, अशोक टी. पाटील, बाळासाहेब भदाणे, व्ही.एन.राजपूत, खाजिनदार पुरूषोत्तम कोतकर, सहखजिनदार केदार जोशी, सहसेक्रेटरी पंकज अग्रवाल, मिलिंद मुडावदकर, उमेश अग्रवाल, शितलकुमार नवले यांच्यासह अनेक ठेकेदार सहभागी झाले.

## धुळे एसीबीने रंगेहाथ पकडले

प्रतिबंधक विभागाकडे तक्रार नोंदवली. त्या अनुषंगाने सापळा रचून महसूल सहा.दिनेश वाघ यांना तडजोडी अंती तेरा हजार रूपयांची रोख रक्कम घेतांना धुळे विभागीय कार्यालयात लाचलुचपत विभागाच्या पथकाने रंगेहात पकडले. आरोपी दिनेश वाघ जवळून एक मोबाईल हस्तगत करण्यात आला. या प्रकरणी शहर पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्याचे रात्री उशीरापर्यंत सुरू होते.

सदरची कारवाई लाच लुचपत प्रतिबंधक नाशिक परिक्षेत्र, नाशिक पोलीस अधीक्षक शर्मिष्ठा घारगे-वालावलकर यांच्या मार्गदर्शनाखाली धुळ्यातील लाचलुचपत प्रतिबंधक विभागातील पोलीस उपअधिक्षक सचिन साळुंखे, पोलीस निरीक्षक रुपाली खांडवी, पंकज शिंदे, पोहवा. राजन कदम, मुकेश अहिरे, प्रविण मोरे, संतोष पावरा, पो.कॉ. रामदास बारेला, मकरंद पाटील, प्रविण पाटील, प्रशांत बागुल, सुधीर मोरे व जगदीश बडगुजर यांनी कारवाई केली.



## कॉपीमुक्त अभियानाबद्दल नरवडेंचा केला सन्मान

धुळे, दि.१०- महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे राज्य मंडळ यांच्यामार्फत राज्यात इयत्ता दहावी व बारावीच्या बोर्ड परीक्षेत राज्यभर कॉपीमुक्त अभियान राबवण्यात आले. या अभियानामुळे धुळे जिल्ह्यात प्रथमच झूम मीटिंग द्वारे सर्व वर्गांवर नजर ठेवल्यामुळे कॉपीमुक्त अभियान यशस्वी झाले. या यशस्वी अभियानासाठी धुळे जिल्ह्यातील शिक्षकांनी जि.प.मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल नरवाडे यांचा नवा भारत घडवा हे पुस्तक देऊन महेश माळी यांनी सत्कार केला. यावेळी विशाल निकम, सचिन देवान, जितेंद्र कन्नोर, गिरीश पाटील, हर्षल बाविस्कर यांनी सहभाग घेतला होता.

## प्रत्येक नागरिकाने गोसेवक बनावे : प्रदीप शर्मांचे आवाहन
## धुळे येथे जमनाबेन लोकसेवक पुरस्कार वितरण उत्साहात



**धुळे दि.१० (प्रतिनिधी)- मानवासाठी गायीचे दूध, शेण अत्यंत उपयुक्त ठरले आहे. प्रत्येकाने गो सेवक बनायला हवे. एका कुटुंबाने गाय पाळणे आर्थिक, सामाजिक दृष्ट्या अत्यंत फायद्याचे ठरते. गौठान योजनेच्या माध्यमातून छत्तीसगडमध्ये लाखों शेतकऱ्यांच्या परिस्थितीत चांगला बदल घडून आलेला आहे. असे प्रतिपादन छत्तीसगड येथील प्रदीप शर्मा यांनी व्यक्त केले.**

महाराष्ट्र गो विज्ञान समिती मालेगाव, धुळे आणि गांधी रिसर्च फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने त्यांना जमनाबेन कुटमुटिया लोकसेवक पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. व्यासपीठावर नरेश यादव (भूतपूर्व खासदार व लोकसेवक) आणि सेवाग्राम आश्रमाचे मंत्री विजय तांबे, गांधी रिसर्च फाउंडेशनचे समन्वयक उदय महाजन, ज्येष्ठ सर्वोदयी डॉ. सुगन बरंठ, साम्ययोग साधना पाक्षिकाचे संपादक रमेश दाणे उपस्थित होते.

महाराष्ट्र गोविज्ञान समिती मालेगाव व धुळे आयोजित तसेच भवरलाल अ‍ॅण्ड कांताबाई जैन फाउंडेशन, गांधी रिसर्च फाउंडेशनच्या सहकार्याने गोसेविका जमनाबेन कुटमुटिया यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ हा पुरस्कार सोहळा काल धुळ्यात बर्वे कन्या छात्रालय येथे संपन्न झाला. हा पुरस्कार धुळे येथे देण्याचे प्रयोजन असे होते की, कुटमुटिया दाम्पत्यांनी आपल्या जीवनातील २० हून अधिक काळ धुळे शहरातील वास्तव्यात व्यतित केला. या शहरातच त्यांनी बहुतांश काळ गोसेवेसाठी दिला. बाईंची गो सेवा करणाऱ्या कार्यकर्त्यांची फौज ही धुळ्यात होती. १९९९ पासून २०१९ पर्यंत मालेगाव येथे हे पुरस्कार प्रदान करण्यात आले. २०१९ नंतर हा पुरस्कार काही वर्षे स्थगित ठेवण्यात आला होता, परंतु आता पुन्हा हा पुरस्कार प्रदान करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यावर्षी २०२५ मध्ये हा पुरस्कार छत्तीसगड राज्याचे प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ते प्रदीप कुमार शर्मा यांना प्रदान करण्यात आला.पुढील काळात धुळे येथेच या पुरस्काराचे वितरण होणार असून त्यासाठीची समिती तयार करण्यात आलेली आहे.

आपल्या सत्काराला उत्तर देताना प्रदीप शर्मा पुढे म्हणाले की, आम्ही लहान होतो त्यावेळी प्रत्येकाच्या घरात गाय होती. गाय असल्याने शेतात प्रोटीन कडधान्य पेरले जात असे. आजच्या काळात महिला आणि बालकांमध्ये प्रोटीनची कमतरता दिसते आहे. गायींबद्दल सांगायचे तर आमच्याकडे १ कोटी ३० लाख गोवंश आहे, त्यापैकी ६५ लाख गायी आहेत. यात अडीच लाख महिला गायीच्या शेणापासून खत बनवितात त्यातून ५२ करोड रुपयांचे उत्पन्न महिलांना मिळाले होते. गौठानचे काम कसे चालते याबाबत त्यांनी उपस्थितांना समजावून सांगितले.

नरेश यादव आणि वर्धा येथील आश्रमाचे मंत्री विजय तांबे यांच्या हस्ते प्रदीप शर्मा यांना पुरस्काराचा ५० हजार रुपयांचा धनादेश, सन्मानचिन्ह व सन्मानपत्र प्रदान करण्यात आले. पुरस्कारांची रक्कम त्यांनी हरिजन सेवक संघाच्या छात्रालयातील मुला मुलींना भेट दिली. सन्मान पत्राचे वाचन वाचन वैद्य वैभव जोशी यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्र संचालन वैद्य अपश्चिम बरंठ यांनी तर आभार प्रदर्शन वैद्य विजय कळमकर यांनी केले. पुरस्कारार्थी प्रदीप शर्मा यांच्या कार्यपरिचय डॉक्युमेंटरीचा व्हाडिओ उपस्थितांना दाखविण्यात आला. कार्यक्रमास कुटमुटिया परिवाराचे सदस्य चेतन कुटमुटिया आणि सौ. निकिता कुटमुटिया यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी धुळे येथील मधुकर शिरसाठ, कृष्णा शिरसाठ, अनिता रामराजे ,वैशाली पाटील आदी कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास प्रा.विलास चव्हाण, जगदीश देवपूरकर, वैद्य प्रविण जोशी, नरेंद्र वडगावकर, डॉ.मृदुला वर्मा,नाजनीन शेख, अनिल जोशी, अनिल देवपूरकर, रमेश पवार, रमेश पाकड, विजय महाले, सुमन महाले आदी उपस्थित होते.

## राज्याच्या अर्थसंकल्पावर धुळ्यात संमिश्र प्रतिक्रिया उमटल्या

**धुळे, दि.१०- राज्याचा अर्थसंकल्प अर्थमंत्री अजित पवार यांनी जाहिर केल्यानंतर धुळे शहर, जिल्ह्यातून संमिश्र प्रतिक्रिया उमटल्या आहेत.**

**बोलाचाच भात...**

आज सादर करण्यात आलेला राज्याचा अर्थसंकल्प पूर्णपणे निराशाजनक आहे. शेतकरी, सर्वसामान्य जनतेच्या तोंडाला पानं पुसणारा हा अर्थसंकल्प आहे. कोणत्याही योजना नाही, तुटीचा अर्थसंकल्प सादर केला आहे. लाडक्या बहिणींसाठी जाहीर केलेले २१०० रुपयांची तरतूी अर्थसंकल्पात केली नाही. निवडणुकीत शेतकऱ्यांची मतं घेतली. तीन लाखांपर्यंत कर्ज माफ करु असं अश्वासन दिलं होतं. मात्र अशी कुठलीही माफी दिली गेली नाही. सरकारने शेतकऱ्यांबरोबर बेईमानी केली आहे. वीज दर कमी करण्याचं आश्वासन दिलं होतं. त्या बाबत चकार शब्दही या बजेटमध्ये काढण्यात आलेला नाही. कृषी क्षेत्रासाठी काही सकारात्मक घोषणा करण्यात आल्या असल्या, तरी कर्जमाफी, कांदा प्रश्न, शेतीसाठी अनुदान आणि भावांतर योजनेतील सुधारणा यासारख्या महत्त्वाच्या मुद्द्यांबाबत कोणताही ठोस निर्णय नाही. राज्यातील शेतकऱ्यांना आधुनिक शेती तंत्रज्ञानाचा लाभ मिळावा, यासाठी ठिबक सिंचन, शेततळे, विहिरी आणि कृषी यंत्रांसाठी अनुदान आवश्यक आहे. मात्र, गेल्या काही वर्षांत शेती अनुदानात कपात झाल्याचे आर्थिक पाहणी अहवालातून स्पष्ट झाले आहे. राज्यात औद्योगिक केंद्र निर्माण करण्याची घोषणा योग्य आहे मात्र आहेत ते उद्योग गुजरातमध्ये जात आहेत याकडे सरकारचे मात्र दुर्लक्ष होत आहे. बेंगलुरु-मुंबई इंडस्ट्रीयल कॉरीडॉरसाठी जमीन संपादनाची कार्यवाही सुरु असल्याचे सांगितले गेले मात्र धुळे जिल्ह्यासाठी वरदान ठरु शकणाऱ्या मुंबई-दिल्ली इंडस्ट्रीयल कॉरीडॉरबाबत चकार शब्द काढला नाही. दरवर्षी राज्याच्या अर्थसंकल्पात खान्देशाच्या तोंडाला पानं पुसण्याचे काम केले जाते. यावर्षीही तोच प्रकार घडला आहे. थोडक्यात, जनतेला जे जे पाहिजे ते ते सर्व देणार पण त्यासाठी राज्याची आर्थिक परिस्थिती सुधारणे गरजेचे असल्याचे या बजेटमधून सांगण्यात आले आहे. बोलचाच भात आणि बोलचीच कढी असे या बजेटचा वर्णन करणे संयुक्तिक ठरेल.

**-कुणाल पाटील**
कार्याध्यक्ष, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी

**निराशाजनक अर्थ संकल्प**

अजित पवारांनी सादर केलेल्या अर्थ संकल्पात शेतकरी, कामगार, कष्टकरी, पावरलुम कामगार लघु उद्योग, यांचे करिता कोणती ही तरतूद करण्यात आलेली नाही, असे दिसते. म्हणजे शेतकरी, कामगार, कष्टकरी, लघु उद्योग यांचेकडे साफ दुर्लक्ष केल्याचे दिसून येत आहे. एकूणच सदरचा अर्थ संकल्प हा शेतकरी, कामगार, लघुउद्योग यांचे करिता निराशा जनक अर्थसंकल्प आहे.

**कॉ.पोपटराव चौधरी**
सेक्रेटरी (शहर) भारतीय कम्युनिस्ट पक्ष

**अजूनही आशावादी आहोत**

राज्याच्या औद्योगिक विकासासाठी अर्थसंकल्पात रू. ६४०० करोड़चे पॅकेज प्रस्तावित आहे. नवीन औद्योगिक धोरणात रू. ४० लाख करोड़ पर्यंतच्या घसघशीत गुंतवणुकीची अपेक्षा आहे. बहुप्रतीक्षित आणि स्वर्णिम दाहोस बंदराच्या विकासामुळे राज्यातील निर्यात वाढीला गती मिळेल. शेती, उद्योग, पायाभूत सुविधा अशा सर्वांगीण विकासाने राज्याचा चौफेर विकास अपेक्षित आहे. मुख्यमंत्र्यांच्या आश्वासनानुसार धुळे जिल्ह्यातील नरदाना येथे मोठ्या प्रकल्पांना येण्यासाठी भरीव घोषणा होणे अपेक्षित होते. समाधानी असलो तरी नेक्स्ट डेस्टिनेशन धुळे साठी अजुनही आशावादी आहोत.

**-वर्धमान सिंघवी**
लघु उद्योग भारती, धुळे



## पोलीस दलातील खेळाडुंची राज्य क्रीडा स्पर्धेत कामगिरी

**धुळे, दि.१०- धुळे जिल्हा पोलीस दलातील खेळाडूंनी ३५ व्या महाराष्ट्र राज्य पोलीस क्रीडा स्पर्धा, ठाणे येथे सहभाग घेतला. विविध क्रीडा स्पर्धांमध्ये उल्लेखनिय कामगीरी बजावणाऱ्या खेळाडुंचा सत्कार जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांनी केला.**

यशस्वी खेळाडुंमध्ये पोहेकॉ. संजय साळुंखे बास्केटबॉल संघ सुवर्णपदक, पोकॉ.अक्षय उगले ज्युदो रौप्य पदक, पोकॉ. सौरभ बागुल तायक्काँदो रौप्य पदक, मपोकॉ. प्रतिभा जगताप वेटलिफ्टींग रौप्य पदक, मपोकॉ. पुजा सांगळे कुस्ती कास्य पदक, मपोकॉ. प्रमिला वळवी वु-शो कास्य पदक पटकावले. खेळाडुंना जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अपर पोलीस अधीक्षक किशोर काळे, पोलीस उपअधिक्षक विश्वजीत जाधव, राज्य राखीव पोलीस निरिक्षक मुकेश माहुले व क्रीडा विभाग प्रमुख संजय साळुंखे यांचे मार्गदर्शन लाभले.

**रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान**



## हंगामी खुल्या कांदा मार्केटचा माजी आ.चंद्रकात रघुवंशींच्या हस्ते शुभारंभ

**नंदुरबार, दि.१० (प्रतिनिधी) - कृषी उत्पन्न बाजार समितीच्या हंगामी स्वतंत्र खुल्या कांदा मार्केटचे उद्घाटन शिवसेनेचे संपर्कप्रमुख तथा माजी आमदार चंद्रकांत रघुवंशी यांच्या हस्ते करण्यात आले. पहिल्याच दिवशी ३०० क्विंटल कांद्यांची आवक झाली असून, १ हजार ८२५ रुपये पर्यंत भाव मिळाला. यंदाच्या उन्हाळी हंगामात २ लाख क्विंटल कांद्याची आवक होणार असल्याची शक्यता बाजार समितीकडून व्यक्त करण्यात आली.**

शहरातील साक्री नवापूर रस्त्यावरील उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या समोरील पटांगणात बाजार समितीच्या हंगामी स्वतंत्र खुल्या मार्केटला सोमवारपासून सुरुवात झाली आहे. लिलावासाठी शेतकऱ्यांनी रविवारी रात्रीपासूनच वाहनांमधून कांदे आणलेले होते. शिवसेनेचे संपर्कप्रमुख तथा माजी आमदार चंद्रकांत रघुवंशी यांच्या हस्ते नारळ वाढवून लिलावास प्रारंभ करण्यात आला.

यावेळी माजी आ.चंद्रकांत रघुवंशी, सभापती संध्या पाटील यांच्या हस्ते शेतकरी, व्यापाऱ्यांच्या सत्कार करण्यात आला. प्रसंगी जि.प माजी अध्यक्ष वकील पाटील, शेती संघाचे अध्यक्ष बी.के पाटील, माजी सभापती विक्रमसिंह वाळवी, माजी जि.प सदस्य देवमन पवार, शेतकी संघाचे संचालक सुरेश शिंत्रे, बाजार समिती उपसभापती गोपाल पवार, सचिव योगेश अमृतकर, संचालक किशोर पाटील,सुनील पाटील, ठाणसिंग राजपूत, मधुकर पाटील, लकडू चौरे, विजय पाटील, दिनेश पाटील आदी उपस्थित होते.

**भाड्याने देणे आहे**
१ रुम किचन असलेले घर भाड्याने देणे आहे
पत्ता : गोविंदा अपार्टमेंट, वर्षा बिल्डींगजवळ, धुळे
-: संपर्क :-
9423494345

**भाड्याने देणे आहे**
मालेगाव रोडटच पहिल्या मजल्यावर असलेले ऑफिस भाड्याने देणे आहे
पत्ता : शारदा हॉटेलच्या बाजुला, मालेगावरोड, धुळे
-: संपर्क :-
9423494345

**भाडेतत्वावर देणे आहे**
प्राधान्य : हॉस्पीटलचा संपूर्ण सेटअप, बँक, सरकारी कार्यालय, क्लासेससाठी
एकूण - ५ हॉल
सुविधा : हवेशीर, भरपूर पाणी, १०० फुटी रस्ता, CCTV कॅमेरा, बेसमेंट पार्किंग, सेप्रेट बाथरुम
पत्ता : नंदलाल दुध डेअरी, देवपूर चर्च समोर, वाडीभोकर रोड, धुळे
-: संपर्क :-
रामलाल जैन- 9422625192, 7840927711
निखिल छोरिया- 9518361688

**पाहिजे**
अकाऊंट कामासाठी आणि कॉम्प्युटर ऑपरेटर पाहिजे
पत्ता : ग.नं.७, पारोळारोड पोलीस चौकीसमोर, बंधन बँकेच्या बाजुला, धुळे
9588418856
9404344999

**पाहिजे**
लॉजिंगच्या कामासाठी वेटर पाहिजे. समक्ष भेटा!
सुयोग लॉज
संकल्प दातांच्या दवाखान्याजवळ, दसेरा मैदान समोर, मालेगावरोड, धुळे

**कार्टून पुठ्ठा रु.१६.०० प्रति किलो बंडल**
येथे सर्व प्रकारची रद्दी विकत घेतली जाईल.
मेवावाला जिन कम्पाऊंड भारत वे ब्रिज, पारोळारोड,धुळे
फोन : 230540
9422296340

**पाहिजेत**
रेडिमेड दुकान कामासाठी मुले लावणे आहेत.
त्वरीत भेटा
-: संपर्क :-
श्री सत्यनारायण ड्रेसेस
ग. नं. २ जैन मंदिराजवळ, धुळे
9423344965

**फ्लॅट विकणे आहे**
फ्लॅट नं. ९
कोणार्क अपार्टमेंट
प्रोफेसर कॉलनी, देवपूर, धुळे
संपर्क:-
7517488159

**- पाहिजेत -**
• नर्स/स्टाफ
• RMO
डे-नाईट शिफ्टसाठी अनुभवी उमेदवार पाहिजेत
इच्छूक उमेदवारांनी समक्ष भेटावे
यशोदा हॉस्पिटल व नेत्रालय
दत्त मंदीर, देवपूर, धुळे
7058912916, 8329249386

**गाळा विकणे आहे**
दत्त मंदिर परिसरात कमर्शिअल गाळा विकणे आहे
साईज 200 sq.ft.
संपर्क वेळ : सकाळी ८ ते ११
9421280913

**पाहिजेत**
रिटेल मेडिकल दुकानात कामासाठी सेल्समन - ३ हेल्पर - ३ लावणे आहे. अनुभव असल्यास प्राधान्य. समक्ष भेटा!
भगत मेडिकल स्टोअर्स
पारोळा रोड, धुळे

**देणे आहे**
चालू स्थितीतील बिअरबार, किचनसह हॉटेल देणे आहे.
-: संपर्क :-
9309114026

LG
Life's Good



बँकेच्या क्रेडीट कार्डवर EMI सुविधा उपलब्ध !
BAJAJ FINSERV HDB FINANCIAL SERVICES
0% फायनान्सची सुलभ E.M.I सुविधा उपलब्ध.
नियम व अटी लागू*
फायनान्सला लागणारी कागदपत्रे
1) पॅनकार्ड 2) आधार कार्ड 3) बँक पासबुक व चेक
ak media- 238222
57 वर्षापासून आपल्या सेवेत...
अधिकृत विक्रेते श्री महावीर इलेक्ट्रीक अ‍ॅण्ड टी.व्ही.
श्रीराम मंदिराजवळ, फुलवाला चौक, आग्रा रोड, धुळे ▪ फोन: 229162, 235763

हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करुन आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-४००४११५, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०